सकाळ

# निवाऱ्याची गरज 'रवळनाथ'मुळे सुलभ

## बारदेस्कर; गडहिंग्लज येथे ज्येष्ठ सभासदांना लाभांश वाटप



गडहिंग्लज : रवळनाथचे ज्येष्ठ सभासद मारुती तेलवेकर यांना लाभांश वितरित करताना जे. बी. बारदेस्कर. शेजारी एम. एल. चौगुले, अण्णासाहेब गळतगे, व्ही. के. मायदेव, डी. के. मायदेव.

**गडहिंग्लज, ता. ८ :** अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या प्रमुख तीन गरजा आहेत. त्यातील महत्त्वाची निवाऱ्याची गरज 'रवळनाथ'मुळेच सुलभ झाली आहे. शिक्षण क्षेत्रात स्वकर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या एम. एल. चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची यशस्वी घोडदौड सुरू आहे, असे मत साधना शिक्षण संस्थेचे सचिव माजी प्राचार्य जे. बी. बारदेस्कर यांनी व्यक्त केले.

श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालयात आयोजित लाभांश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. लायन्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनिअर अण्णासाहेब गळतगे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

गळतगे म्हणाले, "रवळनाथ म्हणजे सहकार व वास्तुशास्त्रातील सर्वोत्तम आदर्शाचा नमुना आहे." चौगुले म्हणाले, "अतिवृष्टी व कोरोनामुळे आर्थिक अडचणीतील सभासदांची दिवाळी गोड व्हावी म्हणूनच लाभांश वाटपाचा निर्णय घेतला."

आय. जी. फुटाणे, मारुती तेलवेकर, प्रा. अण्णासाहेब चौगुले यांचीही भाषणे झाली. शाखा सल्लागार डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले. संचालक डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, विलास कुलकर्णी, महेश मजती, चंद्रकांत पत्की, डॉ. सुभाष पाटील, प्रा. संजीवनी पाटील, प्रा. विजय आरबोळे, बाजीराव आरबोळे, बसवराज रिंगणे, एस. आर. कांबळे, मीना रिंगणे, महादेवी आरबोळे, अलका आरबोळे, गीता चिंचणीकर, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे आदी उपस्थित होते.

### ज्येष्ठांचा सन्मान

रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या रवळनाथच्या वाटचालीत सभासदांचे योगदान महत्त्वाचे आहे. ज्येष्ठ सभासद फुटाणे, तेलवेकर, चौगुले, विजयकुमार आजरी, सुदेव गंध, विजय चिंचणीकर, बंडोपंत इंचनाळकर, निजगुणी स्वामी, इरावती हत्ती यांना लाभांश वाटप करून सन्मान केला. संस्थेच्या सहा हजार ११९ सभासदांना ७४ लाख ५९ हजारांची रक्कम लाभांश म्हणून वाटण्यात आली.

कीर्तिवंत
10 November 2020-page-4

# चौगुलेंच्या दूरदृष्टीमुळेच 'रवळनाथ'ची घोडदौड

## प्राचार्य जे. बी. बारदेस्कर : गडहिंग्लज येथे ज्येष्ठ सभासदांना लाभांश वाटप




**गडहिंग्लज : रवळनाथचे ज्येष्ठ सभासद विजयकुमार आजरी यांना प्राचार्य जे. बी. बारदेस्कर यांच्या हस्ते लाभांश वितरण करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, इंजि. आण्णासाहेब गळतगे, उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव उपस्थित.**

**गडहिंग्लज (प्रतिनिधी) :**

शिक्षण क्षेत्रात स्व:कर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या एम. एल. चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची यशस्वी घोडदौड सुरू आहे, असे गौरवोद्गार साधना शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य जे. बी. बारदेस्कर यांनी काढले. श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीच्या गडहिंग्लज येथील कार्यालयात आयोजित लाभांश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. गडहिंग्लज लायन्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. आण्णासाहेब गळतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

आण्णासाहेब गळतगे म्हणाले, रवळनाथ म्हणजे सहकार आणि वास्तुशास्त्रातील सर्वोत्तम आदर्शाचा नमुना आहे, त्यामुळे संचालकांच्या कार्याला सलाम केला पाहिजे.

एम. एल. चौगुले म्हणाले, सभासद, ठेवीदार आणि ग्राहकांचा विश्वास आणि विनम्रसेवा यामुळेच संस्थेला यश मिळाले आहे. अतिवृष्टी आणि कोरोनामुळे आर्थिक अड ?णीत सापडलेल्या सभासदांची दिवाळी गोड व्हावी म्हणूनच लाभांशं वाटपाचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. गडहिंग्लज शाखा सल्लागार प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

**ज्येष्ठ सभासदांचा सन्मान!**

रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या रवळनाथच्या यशस्वी वाटचालीत सभासदांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रातिनिधीक स्वरूपात संस्थेचे ज्येष्ठ सभासद प्राचार्य आय. जी. फुटाणे, मारूतीराव तेलवेकर, प्रा. आण्णासाहेब चौगुले, विजयकुमार आजरी, सुदेव गंध, विजय चिंचणीकर, बंडोपंत इंचनाळकर, निजगुणी स्वामी, श्रीमती इरावती हत्ती यांना लाभांशाचे वाटप करण्यात आली. संस्थेच्या ६११९ सभासदांना ७४ लाख ५९ हजार ६५० इतकी रक्कम लाभांश म्हणून वाटण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक प्राचार्य डॉ. आ. एस. निळपणकर, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, शाखा सल्लागार विलास कुलकर्णी, महेश मजती, चंद्रकांत पत्की, डॉ. सुभाष पाटील, प्रा. संजीवनी पाटील तसेच सभासद प्रा. विजय आरबोळे, बाजीराव आरबोळे, बसवराज रिंगणे, एस. आर. कांबळे, सौ. मीना रिंगणे, सौ. महादेवी आरबोळे, सौ. अलका आरबोळे, सौ. गीता चिंचणीकर, संस्थेचे सी. ई. ओ. डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे सह सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी




**गडहिंग्लज : येथे 'रवळनाथ'चे ज्येष्ठ सभासद प्राचार्य आय. जी. फुटाणे यांना लाभांश वाटप करताना अण्णासाहेब गळतगे. शेजारी एम. एल. चौगुले, प्रा. जे. बी. बारदेस्कर, उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव आदी.**

# 'रवळनाथ'तर्फे ज्येष्ठ सभासदांना लाभांश वाटप

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले. येथील प्रधान कार्यालयात संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. साधना शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. जे. बी. बारदेस्कर, लायन्स वेल्फेअर असो.चे अध्यक्ष इजि. अण्णासाहेब गळतगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थाध्यक्ष चौगुले यांनी अतिवृष्टी आणि कोरोनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या सभासदांची दिवाळी गोड व्हावी, म्हणून लाभांश वाटपाचा निर्णय संचालक मंडळाने घेतल्याचे सांगितले. शिक्षण क्षेत्रात स्वकर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या एम. एल. चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळे रवळनाथची यशस्वी घोडदौड सुरू आहे, असे गौरवोद्‌गार जे. बी. बारदेस्कर यांनी काढले.

अण्णासाहेब गळतगे, ज्येष्ठ सभासद प्राचार्य आय. जी. फुटाणे, मारुतीराव तेलवेकर, प्रा. अण्णासाहेब चौगुले यांनीही मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या ६,९१९ सभासदांना ७४ लाख ५९ हजार ६५० इतकी रक्कम लाभांश म्हणून वाटण्यात आली.

शाखा सल्लागार प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. संस्थेचे संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, शाखा सल्लागार विलास कुलकर्णी, महेश मजती, चंद्रकांत पत्की, डॉ. सुभाष पाटील, प्रा. संजीवनी पाटील, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे व सभासद, कर्मचारी उपस्थित होते. सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

# चौगुलेंच्या दूरदृष्टीमुळेच रवळनाथ सोसायटीची घोडदौड

प्रतिनिधी
गडहिंग्लज

शिक्षण क्षेत्रात स्वकर्तृत्वाचा ठसा उमटविलेल्या एम. एल. चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची यशस्वी घोडदौड सुरु आहे. असे गौरवोद्गार साधना शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य जे.बी. बारदेस्कर यांनी काढले.

रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील कार्यालयात आयोजित लाभांश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास गडहिंग्लज लायन्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष आण्णासाहेब गळतगे प्रमुख पाहुणे तर अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम.एल.चौगुले होते. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात ज्येष्ठ सभासद प्राचार्य आय.जी. फुटाणे, मारुतीराव तेलवेकर, प्रा. आण्णासाहेब चौगुले, विजयकुमार आजरी, सुदेव गंध, विजय चिंचणीकर, बंडोपंत इंचनाळकर, निजगुणी स्वामी, इरावती हत्ती यांना लाभांश वाटप करण्यात आले. संस्थेच्या ६११९ सभासदांना लाभांश वाटप करण्यात आले आहे. यावेळी श्री. गळतगे, श्री. चौगुले, प्राचार्य फुटाणे, तेलवेकर, प्रा. चौगुले यांची भाषणे झाली. कार्यक्रमास संचालक प्राचार्य आर. एस. निळपणकर, प्रा. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, विलास कुलकर्णी, महेश मजती, चंद्रकांत पत्की, डॉ. सुभाष पाटील, प्रा. संजीवनी पाटील, सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह संस्थेचे सभासद उपस्थित होते. स्वागत शाखा प्रा. दत्ता पाटील यांनी तर सूत्रसंचालन सुरेश दास यांनी केले. आभार प्रा. व्ही. के. मायदेव यांनी मानले.



**गडहिंग्लज : येथे संस्थेचे ज्येष्ठ सभासद विजय चिंचणीकर यांना आण्णासाहेब गळतगे यांच्या हस्ते लाभांश वाटप करण्यात आले. यावेळी एम.एल. चौगुले, जे. बी. बारदेस्कर, व्ही. के. मायदेव, गिता चिचणीकर, डी. के. मायदेव.**

लोकमत



गडहिंग्लज येथे इरावती हत्ती यांना जे. बी. बारदेस्कर यांच्या हस्ते लाभांश देण्यात आला. यावेळी आण्णासाहेब गळतगे, एम. एल. चौगुले, वासुदेव मायदेव उपस्थित होते.

# दूरदृष्टीमुळेच 'रवळनाथ'ची घोडदौड : जे. बी. बारदेस्कर

## गडहिंग्लज येथे सभासदांना लाभांश वाटप

**गडहिंग्लज :** संस्थापक एम. एल. चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची यशस्वी घोडदौड सुरू आहे, असे गौरवोद्गार साधना शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. जे. बी. बारदेस्कर यांनी काढले. येथील प्रधान कार्यालयात लाभांश वाटपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष चौगुले होते. लायन्स वेल्फेअरचे अध्यक्ष आण्णासाहेब गळतगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ सभासद आय. जी. फटाणे, मारुतराव तेलवेकर व आण्णासाहेब चौगुले यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमास सीईओ दत्तात्रय मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे संचालक, सल्लागार, सभासद उपस्थित होते. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुरेश दास यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष वासुदेव मायदेव यांनी आभार मानले.

पाऊण कोटीचा लाभांश रवळनाथच्या ज्येष्ठ सभासदांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभांश वितरित करण्यात आला. एकूण ६११९ सभासदांना लाभांश देण्यात आला.

Hello Kolhapur Gramin
Page No. 4 Nov 08, 2020
Powered by: erelego.com